RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# प्राचीन संस्कृत साहित्यातील 'नाटक' साहित्यप्रकाराचा चिकित्सक अभ्यास

**श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे**
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

**प्रस्तावना**

हे विश्व एक विस्तृत रंगमंच आहे. ज्यावर जीवनरूपी नाटक खेळले जाते. संपूर्ण प्राणीमात्र रंगभूमीवर आपआपल्या भूमिका बजावत असतात. त्यावेळी नाटकाच्या संपूर्ण अंगाशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत असतो. आणि ख-या अर्थाने जीवनाच्या सुखदु:खात्मक क्षणांचे, समस्यारूपी संकटांचे निराकरण सर्व पात्रे मिळून करीत असतात. अर्थातच हा रसपरिपाक आहे. एक संपन्न जीवन जगण्याचा मार्ग शोधण्याचे काम सृष्टीच्या निर्मितीपासून होत आले आहे. म्हणून तर ब्रह्मा नाट्यवेदाची व्याख्या सांगताना म्हणतात, धर्म, अर्थ, काम, यश, आयुष्य, कल्याण इत्यादींचे अनुकीर्तन म्हणजे नाटक होय.

**उद्दिष्ट्ये**

१. प्राचीन संस्कृतसाहित्यातील नाट्यसंकल्पना स्पष्ट करणे.
२. प्राचीन संस्कृतसाहित्यातील नाटकाची परंपरा स्पष्ट करणे.
३. प्राचीन संस्कृतसाहित्यातील नाट्याधार स्पष्ट करणे.
४. प्राचीन संस्कृतसाहित्यातील नाट्यवस्तू स्पष्ट करणे.

**गृहीतके**

१. प्राचीन संस्कृत साहित्यात नाट्यसंकल्पना परिपूर्ण होत्या.
२. प्राचीन काळी नाटकाने मूर्तरूप धारण केलेले होते.

**व्याप्ती**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती प्राचीन संस्कृत साहित्यातील काही ग्रंथांपुरती मर्यादित आहे.

**आवश्यकता**

नाटक म्हणजे काय ? नाटकाची व्युत्पत्ती, रसतत्वाचा समाहार कशा पद्धतीने होतो ? नाटकात रसाचे स्थान काय आहे ? त्यांचा नाटकाच्या कोण-कोणत्या अंगाशी संबंध येतो ? नाटकाचे प्रयोजन, नाट्याधार, नाट्यवस्तू इ. संबंधीत सखोल चर्चा करणारे जे प्राचीन संस्कृतग्रंथ उपलब्ध आहेत. त्या ग्रंथातील विचार आपणापर्यंत पोहोचवावेत हाच या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश होय.

**अभ्यासाची पद्धती**

**विवेचनात्मक पद्धती**

ग्रंथालयातील उपलब्ध प्राचीन संस्कृतग्रंथांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे विवेचन केलेले आहे.

**विषय विवेचन**

**नाटकाची व्युत्पत्ती**

नाटक हा शब्द 'नट्' या धातुपासून बनलेला आहे. याचा अर्थ 'अभिनय करणे'[१] हा आहे. अभिनयकर्त्याचे जे कृत्य ते नाटक होय. काहीच्या मते 'नट्' धातुचा अर्थ गात्रविक्षेप असा आहे. पण कालांतराने 'नट्' धातुच्या अर्थाशी जवळचा असलेला 'अभिनय' हा अर्थ प्राप्त झाला. म्हणजेच अभिनय करणे, रूप बदलणे, विकार, प्रदर्शन, अवस्थाचे अनुकरण, जीवन चित्रण इ. अनेक अर्थच्छटा त्याला प्राप्त झाल्या.

नाटक म्हणजे नटाची अभिनयकला असा अर्थ रूढ झाला. या अर्थाची अधिक फोड भरतमुनींनी नाट्यशास्त्राच्या पहिल्याच अध्यायात केली आहे.

त्रैलोक्यस्यास्य सर्वस्य नाट्यं भावानुकीर्तनम् ।[२]

नाटक म्हणजे या सर्व त्रैलोक्याच्या भावभावनांचे अनुकरणात्मक प्रकटीकरण होय.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

सुखदु:खानेयुक्त असा लोकस्वभाव नाटकात अभिनयाद्बारे व्यक्त करायचा असतो. निसर्ग किंवा लोकस्वभाव हा मुख्य आधार घेऊन आहार्य, आंगिक, वाचिक, सात्विक या चार प्रकारच्या अभिनयांनी तो अत्यंत सुरस आणि सुंदर करुन कलात्मकतेने मांडणे म्हणजे नाटक होय. ही भरताची नाटकाविषयीची कल्पना आहे.

कालिदासाने आपल्या मालविकाग्निमित्रात नाटकाचे जे वर्णन केलेले आहे. तेही भरतमताला अनुसरणारे आहे.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरूचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥[३] (१.४)

नाटकात सत्व, रज, तम या तीन गुणांतून उद्भवणारे आणि नाना रसांनीयुक्त असे लोकव्यवहार दिसतात आणि त्यामुळे नाटक हे वेगवेगळया आवडी असणा-या लोकांचे एकमेव मनोरंजनाचे साधन ठरते.

**प्रयोजन**

सर्वसाधारण प्रेक्षकांना आनंदाची प्राप्ती करुन देणे हे नाटकाचे प्रयोजन आहे असे अभिनवगुप्ताचे मत आहे.

उत्तमाधममध्यानां नराणां कर्मसंश्रयम् ।
हितोपदेशजननं धृतिक्रीडासुखादिकृत् ॥ ११३
दु:खार्तानां श्रमार्तानां शोकार्तानां तपस्विनाम् ।
विश्रान्तिजननं काले नाट्यमेतन्मया कृतम् ॥[४] ११४

पण केवळ मनोरंजन हे नाटकाचे प्रयोजन होऊ शकत नाही. असे भरतमुनींचे मत आहे.

मनोरंजन हे धर्म आणि यश यांना धरून असले पाहिजे. आणि ते धर्म, अर्थ, काम, मोक्ष पुरुषार्थांचे साधक असले पाहिजे. नाटकात सर्व प्रेक्षकांना उपयुक्त होईल असे विविध प्रकारचे साहित्य असते. शूरांना त्यातून उत्साह मिळतो. भित्र्यांना धैर्य मिळते. कामीजनांना त्यातून कामविषयक उत्तेजना मिळते. विद्वानांना विद्यानंद मिळतो. दु:खार्ताला दिलासा मिळतो. नाटक हे विरंगुळा देणारे असते. तसेच ते बोधप्रददेखील असते.

नाटकाला दृश्यकाव्य असेही नाव आहे. कारण ते दृश्यही असते आणि श्राव्यही असते. नाटकाच्या प्रेक्षकांना पात्रांचा अभिनय घडणारे प्रसंग आणि रंगभूमीची सजावट या गोष्टी पहायच्या असतात आणि पात्रांचे संवाद व इतर ध्वनी ऐकायचे असतात. त्यापैकी जे दृश्य असते ते अभिनेय असते. त्या अभिनेय दृश्याला मूळचे नाव रूपक आहे 'अवस्थानुकृतिर्नाट्यं रूपं दृश्यतयोच्यते ।'[५] अभिनयाने व्यक्त होणे म्हणजे रूपक. नटांनी राम – श्रीकृष्ण,दुष्यंत – शकुंतला, राम-सीता-रावण इत्यादींची रुपे घ्यावयाची असतात व प्रेक्षकांनी त्या नटावर वरील रूपांचा आरोप करायचा असतो. म्हणजे नाटकात राम, श्रीकष्ण, दुष्यन्त, रावण यांचे काम करणारा नट हाच राम , श्रीकृष्ण, दुष्यन्त, रावण आहे समजायचे असते शकुंतला व सीतेचे काम करणारी नटी हीच शकुंतला व सीता आहे असे मानावे लागते .

**नाटकाचे स्वरूप**

नाटक हा एक साहित्यप्रकार आहे. त्याचे मूल्यमापन मात्र रंगभूमीवर होते. रंगभूमी ही काळाप्रमाणे बदलत असते. कारण लोकांची अभिरूची आणि तत्कालीन आर्थिक व्यवस्था यावर रंगभूमीची निर्मिती होत असते . त्यामुळे नाटकाचे स्वरूपही सारखे बदलत असते

प्राचीनकाळी संस्कृत नाटकांचे प्रयोग हे राजप्रासादात होत होते. सामान्य लोकांपर्यंत ते पोहोचू शकत नव्हते. त्यामुळे नाटकाचे नायक हे धीरललित असे राजेच असत.[६] राजाची प्रेमप्रकरणे आणि त्यांचे पराक्रम हेच नाटकाचे विषय असत. शृंगार आणि वीर या दोन रसांचा त्यात प्राधान्याने समावेश असे .

रंगभूमीला असे स्वाभाविक बंधन पडल्यामुळे प्राचीन संस्कृत नाटकांत म्हणावे तसे परिवर्तन होऊ शकले नाही. भरतमुनींनी नाटकाचे जे लक्षण सांगितले त्याच चौकटीत ते बसत गेले. त्याचाच कित्ता सर्व नाटककार गिरवीत राहिले.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पण याशिवाय राजप्रासादाबाहेरही एक प्रकारचे नाटक चालू होते. ते नृत्यात्मक स्वरूपाचे होते. जत्रा, उत्सव, सार्वजनिक यात्रा अशा प्रसंगी त्यांचे प्रयोग होत[७] आणि समाजाच्या सर्व थरांतील जनता ते नृत्यनाट्य मोठ्या आवडीने पाहत असत.

पुढे विश्वनाथाच्या काळापर्यंत विविध नाटकप्रकारांचा विकास झालेला आपणास दिसतो. त्यामुळे कदाचित तत्कालीन साहित्यशास्त्रज्ञांना त्यांचा विचार करणे भाग पडले. नंतर त्यांनी त्या त्या नाटयप्रकारांची तपासणी करून त्यांची लक्षणे निश्चित केली आणि त्यांना रुपके म्हणून नाट्यशास्त्रात स्थाने दिले. त्या रुपकांचे दहा प्रकार सांगितलेले आहेत. ते असे.१) नाटक २) प्रकरण ३) भान ४) व्यायोग ५) समवकार ६) डिम ७) ईहामृग ८) अंक ९) वीथी १०) प्रहसन

वरील दहा रुपकांपैकी पहिला व महत्वाचा प्रकार म्हणजे नाटक होय.

नाटक कशाला म्हणावे याविषयी भरतमुनी म्हणतात.

देवतानामृषीणां च राज्ञां चोत्कृष्टमेधसाम् ।
पूर्ववृत्तानुचरितं नाटकं नाम तद्‌भवेत् ॥
यस्मात्स्वभावं संत्यज्य साड.गोपाड.गगतिक्रमैः ।
प्रयुज्यते ज्ञायते च तस्माद्वै नाटकं स्मृतम् ॥[८] १९.१२२.१२३

देवदेवता, ऋषी, राजे व प्रखर बुध्दीचे लोक यांच्या पूर्वकालीन वृत्तान्ताला अनुसरुन जी क्रिया करीत. तिला नाटक असे नाव आहे. ज्याअर्थी स्वाभाविक प्रक्रियेचा त्याग करून अंग, उपांग यांनीयुक्त गतीचा उपयोग प्रयोगात केला जातो व त्याचा प्रेक्षकांना बोध होतो. म्हणून त्याला नाटक म्हणतात.

म्हणजेच नाट्य ही भाव आणि अवस्था यांची अनुकृती आहे. या अनुकृतीत सौंदर्यव्यापारही अभिप्रेत आहे. लोकवृत्तात दिसून येणा-या भाव आणि अवस्था जेव्हा सौंदर्यव्यापारातून अभिव्यक्त होतात. तेव्हा ते नाट्य होते.

यानंतर नाटकाचे स्वरूप कसे असावे याविषयी साहित्यदर्पणकार विश्वनाथाने असे म्हटले आहे की, नाटकाचे कथानक रामायण - महाभारत इ. ग्रंथांच्याद्वारे लोकांना पूर्वपरिचित असावे. ते पाच संधीयुक्त असावे. त्यात मानवी सुखदु:खातून निर्माण होणारे नाना रसांचे प्रसंग असावेत. त्याच्या अंकाची संख्या पाच ते दहापर्यंत असावी. नाटकाचा नायक राजश्री असावा. तो पराक्रमी व धीरोदात्त असावा. नाटकात नायकाव्यतिरिक्त इतर चार-पाच मुख्य पात्रे असावीत. नाटकात शृंगार व वीर हे प्रधानरस असावेत. नाटकाचा शेवट अद्‌भुत रसात व्हावा.

नाटकामध्ये नट व नाटककार या दोघांचाही व्यापार असतो. नाटककार हा भावांचे अनुकीर्तन करण्यासाठी लौकिक प्रवृत्तींचे दर्शन नाटकाच्या कथानकातून घडवितो. कारण कथा ही नाटकातील मुख्यवस्तु असते. एखाद्या कथेवरच नाटकाची उभारणी होत असते. नाट्यकथा म्हणजे इतिवृत्त होय. ते नाटकाचे शरीर असते. असे भरतमुनींनी म्हटले आहे. ‘इतिवृतं तु नाट्यस्य शरीरं परिकीर्तितम् ।’[९] १९.१

**नाट्योत्पत्ती**

नाटकाचा उगम सर्व जगात एक धार्मिक कृत्य म्हणून झाला असे अनेक विद्‌वानांचे मत आहे. काहींच्या मतानुसार नाटकाचा उगम ऋतुपरिवर्तन किंवा वर्षबदल याप्रसंगी आदिम मानवाच्याकडून केल्या जाणा-या धार्मिक नृत्यगीतांतून झाला आहे. आजही आदिवासी समाजात अशाप्रकारची नृत्यगीतनाट्ये होत असतातच. दुस-या काही विद्वानांच्या मते नाटक हे मृत पूर्वजांच्या सन्मानासाठी निर्माण झाले. काही आदिवासी लोक आपला मृत पूर्वज परलोकी अमर व्हावा आणि त्याने आपल्या आप्तेष्टांवर सदैव कृपा ठेवावी म्हणून नाट्याचे आयोजन करीत, तर काही समाज देवीदेवतांच्या संतोषासाठी तिच्या वार्षिकोत्सवात नाटक करून दाखवित. अजूनही ही चाल दक्षिणेत ब-याच ठिकाणी आहे. [१०]

म्हणजेच जगातल्या सर्व संस्कृतींनी आपल्या गरजेनुसार नाटकाची निर्मिती केलेली आहे असे दिसते. ही नाटके लोकनाट्याच्या स्वरूपाची आहेत. त्यांचा प्रयोग काही व्यक्ती वा व्यक्तिसमूह यांच्याद्वारे होत असतो. कळसूत्री बाहुल्या, छायाप्रतिमा इ. गोष्टींच्या सहाय्याने नाटकाचा उद्‌देश सफल केला जातो. त्यांचे साहित्यिक स्वरूप सामाजिक उद्‌दिष्टांनी प्रभावित असते. या नाटकासाठी विशेष नियमांचे बंधन नसते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**नाटक परंपरा**

भारतातील नाटक परंपरा अत्यंत प्राचीन आहे. भारतीय नाटकाचा उगम नक्की केव्हा झाला हे निश्चित सांगता येणार नाही. पण वेदकालाहून प्राचीन असावा. एवढे सांगता येते. कारण भारतीय नाटकाचे साहित्यिक रूप ऋग्वेदातील संवादसूक्तांतून प्रथमत: दिसले. ऋग्वेदात सरमा-पणि, यम-यमी, विश्वमित्र-नदी, अग्नी-देव, पुरूरवा-उर्वशी यांचे नाटकाला अनुकुल असे सुंदर संवाद आहेत.[११] वैदिक ऋषी त्या त्या व्यक्तीचा अभिनय करून ते संवाद म्हणत असावेत. असे वाटते. दहाव्या मंडलातल्या एकशे एकोणिसाव्या सूक्तात तर इंद्र सोमपानाने धुंद होऊन एकटाच बोलत आहे असे दाखविले आहे. [१२] यालाच आपण नाट्यछटा असे म्हणतो. आठव्या मंडलातल्या तेहतिसाव्या सूक्तात आसंग प्लायोगी नावाच्या पुरूषवेशधारी स्त्रीला इंद्र म्हणतो की, खाली पहा, वर पाहू नकोस, आपले पाय नीट जुळलेले ठेव.[१३] (८.३३) यात वेषांतर करणे या नाट्यरंगाचा स्पष्ट उल्लेख दिसतो.

अथर्ववेदाच्या २० व्या कांडाचे १३३ वे सूक्त हे खिलसूक्त आहे. त्यात कुमारी - ब्रह्मचारी यांचा संवाद आहे.[१४] तोही नाट्यात्मक संवाद आहे. यजुर्वेदातील रूद्राध्यायात रूद्राला विश्वरूप म्हटले आहे.[१५] हा विश्वरूप म्हणजे अनेकांची रूपे घेऊन लोकांची करमणूक करणारा बहुरूपीच असला पाहिजे. त्याच अध्यायात रूद्राच्या घोर आणि शिव अशा दोन रूपाचा उल्लेख आहे. ही दोन रूपे एकाच शिवाची आहेत. भारतीय नाट्याचा प्रारंभ या रूपे बदलण्याच्या कलेतूनच झालेला असावा.

वैदिक वाड्.मयात आढळणारे नाट्यविषयक उल्लेख वेदोत्तर वाड्.मयात अधिकाधिक स्पष्ट होऊ लागतात. वाल्मिकी रामायणात (१.१८.१८) व महाभारतात (वन. १५.१४ शान्ति ६९.५१ व ६०) नाटक शब्दाचा अर्थ पौराणिक व ऐतिहासिक उपाख्यान असाही आढळतो.

**नाट्याधार**

संस्कृत नाटकांतील कथांचे आधार पुढीप्रमाणे आहेत. रामायण, महाभारत, गुणाढयाची बृहत्कथा आणि उपलब्ध इतिहास याशिवाय काही कवींनी प्रचलित लोककथांतूनही आपल्या नाट्यवस्तूची निवड केलेली दिसते.

१. **रामायण** - भासकृत अभिषेक आणि प्रतिमा, भवभूतिकृत महावीरचरित व उत्तररामचरित, जयदेवकृत प्रसन्नराघव.

२. **महाभारत** - भासकृत पंचरात्र, मध्यमव्यायोग, दूतवाक्य, दूत घटोत्कच, कर्णभार व उरूभंग, कालिदासकृत अभिज्ञानशाकुन्तल, भट्टनारायणकृत वेणीसंहार.

३. **बृहत्कथा** - गुणाढयाची बृहत्कथा ही अनेक नाट्यकथांची आणि काव्यांची एक समृध्द खाणच आहे. भास हा बृहत्कथापूर्व ठरला तर त्याची उदयनविषयक दोन नाटके प्रतिज्ञायौगन्धरायण व स्वप्नवासवदत्त ही बृहत्कथेत आलेल्या मूळ लोककथांवरून लिहिली गेली असली पाहिजेत असे म्हणावे लागेल.[१६]

४. **इतिहास** - प्राचीन भारतात ज्याला शुध्द इतिहास म्हणतात. त्याची साधने फारशी उपलब्ध नव्हती. सर्व पौराणिकच मानले जाई. पण हल्ली उपलब्ध झालेल्या साधनांवरून काही प्राचीन इतिहास उपलब्ध झाला आहे. त्यादृष्टीने पाहिल्यास कालिदासाचे मालविकाग्निमित्र व विशाखादत्ताचे मुद्राराक्षस ही दोन नाटके ऐतिहासिक आधारावर रचलेली मानावी लागतील. अग्निमित्राचा पिता पुष्यमित्र याचा इतिहास उपलब्ध आहे. (इ.स. पूर्व १८५ ते इ.स. पूर्व १४९) तीच गोष्ट मुद्राराक्षसातील चंद्रगुप्त मौर्याची (इ.स. पूर्व ३२२ ते २९८ )

५. **लोककथा** - भासाची अविमारक व चारूदत्त ही दोन नाटके लोककथेवर आधारलेली आहेत.

**संस्कृतातील काही प्राचीन नाटककार**

ज्याच्या नाट्यकृती उपलब्ध झाल्या आहेत. अशा नाटककारांपैकी भास हा (ख्रि. पू. २ रे शतक) आद्य नाटककार असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तो कालिदासाच्या पूर्वी होऊन गेला. कालिदासही आपल्या साहित्यात त्याचा आदरपूर्वक उल्लेख करतो. स्वप्नवासवदत्त हे त्याचे नाटक अनेक गुणांनी श्रेष्ठ व सरस गणले जाते. इ.स. १९१० सालापर्यंत त्याचे एकही नाटक प्रत्यक्ष उपलब्ध नव्हते. पण इ.स. १९१२ साली तिरूअनंतपूरम् येथे श्री.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

टी. गणपतीशास्त्री यांना ताडपत्रांवर लिहिलेली भासाची तेरा नाटके सापडली. भासाचे काही नाट्यगुण इतके श्रेष्ठ होते की, त्यांचा पुढील नाटककारावर प्रभाव पडल्यावाचून राहिला नाही.

शूद्रकाचे मृच्छकटिक हे नाटक भासाच्या चारुदत्तावरून लिहिलेले आहे. कालिदास, भवभूती, हर्षवर्धन या तीन श्रेष्ठ नाटककारांवरही भासाची छाप पडलेली दिसते. यावरुन भास हा पुढील नाटककारांचा स्फूर्तिदाताच ठरला असे म्हणायला काहीही हरकत नाही.

कालिदास (इ.स. चौथ्या शतकाचा उत्तरार्ध) हा भासानंतरचा नाटककार असला तरी गुणदृष्ट्या तो पहिला ठरतो. त्याची अभिज्ञानशाकुंतल, विक्रमोर्वशीय ही दोन नाटके प्रेम व साहसकथा यादृष्टीने उत्कृष्ट आहेत. मालविकाग्निमित्र नाटकात राजाच्या अन्त:पुरातील प्रेमविषयक उलाढाली वर्णिलेल्या आहेत. समृद्ध कल्पनाविलास, नाजूक भावनांचा आविष्कार आणि निसर्गाबद्दल प्रेम या गोष्टी कालिदासाच्या नाटकांत पदोपदी अनुभवास येतात.

त्यानंतरचा सुप्रसिध्द नाटककार म्हणजे शूद्रक होय. त्याचे मृच्छकटिक नाटक सार्वकालिक लोकाभिरूचीला पात्र ठरले आहे. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे नाट्यशास्त्रात सांगितलेल्या मर्यादांचे उल्लंघन करून नाटक रचलेले आहे. यातील नायिका ही गणिका असून नायक ब्राह्मण व्यापारी आहे. त्यामुळे भरतमुनीच्या नाट्यनियमात हे नाटक बसत नाही.

इ.स. च्या सातव्या शतकातला हर्षवर्धन हा नाटककार कनौजचा सम्राट होता. त्याने रत्नावली, प्रियदर्शिका व नागानंद अशी तीन नाटके लिहिली. त्याच्या रत्नावली नाटकावर मालविकाग्निमित्र या नाटकाची सावली पडली असावी असे वाटते तर त्याच्या नागानंद नाटकावर बौद्धधर्माची छाप पडलेली असावी असे वाटते.

कालिदासाच्या जोडीने ज्याचे नाव घेतले जाते तो म्हणजे भवभूती (इ.स.७०० ते ८००) होय. त्याची मालतीमाधव, उत्तररामचरित, महावीरचरित ही तीन नाटके उपलब्ध आहेत. भवभूती गंभीर स्वभावाचा नाटककार आहे. नाजूक व सौम्य भावनांच्यापेक्षा भव्य व उदात्त भावनांचे आविष्करण त्याला प्रिय वाटते. भवभूती हा करूणरसप्रधान आहे. त्याच्याइतके कारूण्याचे यथार्थ स्वरूप कोणालाही प्रकट करता आले नाही.

अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम ।

इ. स. ८ व्या शतकात विशाखादत्त नावाचा प्रसिदध नाटककार होऊन गेला. मुद्राराक्षस हे त्याचे यशस्वी व आकर्षक असे नाटक होय. या नाटकात प्रेमकथेला थारा नाही. आर्य चाणक्याने चंद्रगुप्ताच्या हितासाठी पूर्वीच्या पदच्युत नंदराजाच्या राक्षस नामक मंत्र्याला आपल्याकडे वळविण्यासाठी अनेक युक्त्या कशा लढविल्या ते या नाटकातून दाखविले आहे. आरंभापासून अखेरपर्यंत मन वेधून ठेवणारे हे नाटक आहे.

भट्टनारायण हा वेणीसंहार नाटकाचा नाटककार आहे.महाभारतावरील भीमकृत दु:शासन वधाच्या कथेवर हे नाटक आधारलेले आहे. यामध्ये वीररसाचा परिपोष पहावयास मिळतो.

## निष्कर्ष

वरील सर्व विवेचनावरून असे दिसून येते की, नाटक हे मानसांच्या अंतर्बाहय क्रियाप्रतिक्रियांच्या द्वंद्वाचे दर्शन आहे. ही नाटकाविषयीची धारणा अशी होती की, मूळ जीवन स्थिर व अचल असून त्यात होणारे बदल वरवरचे व तात्पुरते आहेत. नाटककाराने त्यांना महत्त्व देऊ नये. त्याने रज तम गुणांना बाजूला सारून सात्विकतेचे दर्शन घडवावे. जीवनाच्या मूलभूत आनंदमयतेचे हे दर्शन उज्ज्वल व चित्ताकर्षक करण्यासाठी सुंदर चित्रांच्या गडद पार्श्वभूमीप्रमाणे आवश्यक तेवढी दु:खे व संकटे नाटकात दाखवावीत. कारण नाट्यकला ही केवळ मनोरंजनासाठी नाही. त्याचप्रमाणे ती वास्तवाच्या नग्नप्रदर्शनासाठीही नाही. हितोपदेश हे तिचे एक महान प्रयोजन आहे. जगात सुखदु:खांची द्वंद्वे एकमेकांवर आघात करीतच असतात. तरीही त्यांच्या तळाशी असलेले चैतन्य केवळ अव्यय आणि आनंदमय असेच आहे.कारण हे तत्त्व नाटककाराने कधीही दृष्टिआड करू नये. कारण नाटक पाहिल्यावर

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

जीवनविषयक श्रध्दा वाढावी. नैराश्य दूर व्हावे. दुर्गुणांचा पराभव व्हावा. सद्गुणांचा जय व्हावा आणि नाट्यकलाकृतीचा आस्वाद घेतल्यानंतर अन्ती अंत:करण अत्यंत आनंदी व प्रसन्न व्हावे एवढीच अपेक्षा.

## संदर्भसूची

1) ओक जनार्दन विनायक १९९८ संस्कृत मराठी शब्दकोश वरदा सेनापती बापट मार्ग पुणे १६ पान नं. ५६५
2) श्रीभरतमुनी १९४३ नाट्यशास्त्रम् निर्णयसागर प्रेस पो. कालबादेवी मुंबई पान नं. ११
3) कालिदास १९७६ कालिदास ग्रन्थावली काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणसी पान नं. २६२
4) श्रीभरतमुनी १९४३ नाटयशास्त्र निर्णयसागर प्रेस पो. कालबादेवी मुंबई पान नं. ११, १२
5) भरतमुनी १९७४ दशरूपक विधान महाराष्ट राज्य साहित्य संस्कृति मंडळ मुंबई पान नं. १
6) तिथेच पान नं. ६
7) महाकवि भवभूती १९७६ उत्तररामचरितम् चौखंबा संस्कृत सीरीज आफिस वाराणसी पान नं.३
8) भरतमूनी १९७४ दशरूपक विधान महाराष्ट राज्य साहित्य संस्कृति मंडळ मुंबई पान नं. ३१९
9) तिथेच पान नं. १५१
10) पं. जोशी महादेवशास्त्री १९६७ भारतीय संस्कृतीकोश चौथा खंड भारतीय संस्कृतीकोश मंडळ ४१३ शनिवार पेठ पुणे २ पान नं. ७६९
11) वेलणकर श्री. भी. प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान केशव भिकाजी ढवळे गिरगाव मुंबई ४ पान. नं. २७
12) देवधर स. कृ. १९०३ ऋग्वेद प्रसाद प्रकाश १८९२ सदाशिव पेठ पुणे ४११०३० पान. नं. ३८२
13) तिथेच पान नं. २८७
14) देवधर स. कृ. १९०३ अथर्ववेद प्रसाद प्रकाशन १८९२ सदाशिव पेठ पुणे ४११०३० पान नं. ४१७
15) २००२ यजुर्वेद संहिता चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान ३८ यू. ए. बंगलो रोड जवाहरनगर दिल्ली ११०००७ पान नं. ६३ ते ६८
16) २०१२ संस्कृतसारिका महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ४११००४ पान नं. ५० ५१

## संदर्भग्रंथ सूची

1) ओक जनार्दन विनायक संस्कृत मराठी शब्दकोश वरदा सेनापती बापट मार्ग पुणे १६-१९९८
2) कालिदास कालिदास ग्रन्थावली काशी हिंदू विश्वविदयालय वाराणसी १९७६
3) जोशी स. ब. भाषा व साहित्य संशोधन महाराष्ट परिषद पुणे १९८१
4) देवधर स. कृ. ऋग्वेद प्रसाद प्रकाश १८९२ सदाशिव पेठ पुणे ४११०३०-१९०३
5) प्रा. देशमुख मा. म. प्राचीन भारताचा इतिहास विश्वभारती प्रकाशन धनवटे चेम्बर्स सीताबर्डी नागपूर १९९८
6) भरतमुनी दशरूपक विधान महाराष्ट राज्य साहित्य संस्कृति मंडळ मुंबई १९७४
7) श्रीभरतमुनी नाटयशास्त्रम निर्णयसागर प्रेस पो. कालबादेवी मुंबई १९४३
8) महाकवि भवभूती उत्तररामचरितम चौखंबा संस्कृत सीरीज आफिस वाराणसी १९७६
9) यजुर्वेद संहिता चौखंबा प्रतिष्ठान ३८ यू. ए. बंगलो रोड जवाहरनगर दिल्ली ११०००७ २००२
10) वेलणकर श्री. भी. प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान केशव भिकाजी ढवळे गिरगाव मुंबई ४